||सिध्दिरनेकान्तात||
Estd-June 1962
Anekant Education Society's
# TULJARAM CHATURCHAND COLLEGE
of Arts, Science and Commerce, Baramati, 413102
Autonomous
Religious Minority Institute

प्रति,
मा. प्राचार्य,
तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय, बारामती - ४१३१०२

विषय:- मानवी हक्क दिन अहवाल.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, आपणांस अहवाल सादर करण्यात येतो की, शुक्रवार दि .१० डिसेंबर, २०२१. रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या उपक्रमा अंतर्गत आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाव्दारें "मानवी हक्क दिन" ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला होता. यावेळी "मानवी हक्काचे महत्व" या विषयावर मा. डॉ. लेसन आझादी, संचालक, बहाई अकॅडमी, पाचगणी, सातारा यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. लेसन आझादी सर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ . अजित तेलवे सर उपस्थित होते . यावेळी ऑनलाइन व्याख्यानाचे संयोजक आणि राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. हनुमंत फाटक सर तसेच या व्याख्यानाला मोठ्या प्रमाणात विध्यार्थी आणि प्राध्यापक उपस्थित होते. या व्याख्यानाचा प्रारंभ सकाळी ११:०० वा. ऑनलाईन पध्दतीने करण्यात आला.

दुसऱ्या महायुद्धा नंतर राष्ट्रसंघटने मध्ये मानवी हक्काची चर्चा सुरू होती. त्याच कालखंडा मध्ये भारतीय संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू होती. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवी हक्काच्या संहिते मधील अनेक तत्वे भारतीय संविधाना मध्ये समाविष्ट केली. त्यामुळे भारतीय संविधाना मध्ये मानवी हक्काचे प्रतिबिंब उमटलेले दिसून येते असे गौरवोद्‌गार डॉ. लेसन आझादी सर यांनी व्यक्त केले.

डॉ. लेसन आझादी सर म्हणाले की, 'इ.स. न. पूर्व ५३९ मध्ये पर्शियन 'राजा सायरस द ग्रेट' यांनी वेगवेगळ्या धर्माच्या आणि भाषेच्या लोकांना एकत्र करून प्रथम मानवी हक्काची सुरुवात केली'. 'राजा सायरस द ग्रेट' यांनी मानवी हक्काच्या संहितेचा 'सायरस सिलेंडर' जाहीर केला. गुलामगिरी या प्रथेला बंदी घालून विविध धर्माच्या आचरण करण्यासाठी धार्मिक प्रार्थना

स्थळांची उभारणी केली. ‘राजा सायरस द ग्रेट 'यांच्या मानवी हक्काच्या संहित मधील अनेक तत्वांचा स्वीकार संयुक्त राष्ट्र संघटनेने मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात केली आहे. अनेक शतकांपासून मानवी हक्कांमध्ये बदल घडत आहे. जगातील विविध राष्ट्रांमध्ये मानवी हक्कांचा प्रसार झाला. १२१५ मध्ये इंग्लंड मध्ये ‘मॅग्नाकार्टा’ ही मानवी हक्काची सनद स्वीकारली गेली. त्या नंतर जगाला अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती यांनी मानवी हक्काच्या मूल्यांची देणगी दिली. असे मत डॉ. लेसन आझादी सर यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे सर उपस्थित होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अजित तेलवे सर म्हणाले की, १९९३ मध्ये आपण मानवी हक्काच्या कायद्याचा स्वीकार केला असला. तरी आपण स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय या मानवी मूल्यांचा स्वीकार संविधाना मध्ये केलेला आहे. भारताची महान परंपरा ‘वसुधैवकुटुम्बकम्’ या मानवी मूल्यावर उभी आहे. जग हेच एक कुटुंब आहे. मानवी हक्कांचा उपयोग हा मानवाच्या शाश्वत विकासासाठी झाला पाहिजे. आज आपल्याला मिळालेल्या अधिकारांचा वापर आपण जाणीव पूर्वक आणि जबाबदारीने करणे आवश्यक आहे. आपण व्यक्ती म्हणून मानवी हक्कांन इतकेच प्रत्येक सजीवाच्या अधिकारांविषयी सुद्धा संवेदनशील असले पाहिजे. असे मत उपप्राचार्य डॉ. अजित तेलवे सर यांनी व्यक्त केले. सदर व्याख्यानाला ५३ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ . कैलास मांटे यांनी केले . तर आभार प्रा . राजू पांडे यांनी मांडले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मा . प्राचार्य डॉ . चंद्रशेखर मुरूमकर सर , उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप सर, डॉ. अजित तेलवे सर, उपप्रचार्य डॉ. जगदिश देशपांडे सर, उपप्रचार्य डॉ. रामचंद्र सपकळ सर, उपप्रचार्य डॉ. सीमा नाईक गोसावी मॅडम, उपप्रचार्य डॉ. योगिनी मुळे मॅडम, महाविद्यालयाचे रजिस्टार श्री. अभिनंदन शहा सर यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

ऑनलाइन मानवी हक्क दिन **साजरा झाला. त्याची काही छायाचित्रे**.












डॉ हनुमंत फाटक

राज्यशास्त्र विभाग प्रमुख